www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# Paper-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 01224

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर,
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in



# Marathi
## Paper II
## मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर** **(100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** **(2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. भारतातील पुढील साहित्यप्रकारांचा कोणकोणत्या भाषांशी संबंध येतो, या संदर्भात सार्थक जोड्या जुळवा :

(*a*) संगम-साहित्य (1) असमिया

(*b*) अवधान-साहित्य (2) मलयालम

(*c*) संदेश-काव्य (3) तेलगू

(*d*) बुरंजी-साहित्य (4) तमीळ

(5) कोंकणी

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (2) | (1) |
| (B) | (3) | (2) | (1) | (4) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

2. एकोणिसाव्या शतकातील प्राच्यविद्याशास्त्रांच्या (Orientalist) दृष्टिकोनातून 'भारतीय साहित्य' म्हणजे संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य, असे जरी असले तरी मेकॉले आणि मॅक्स मुल्लर या दोघांना 'भारतीय साहित्य' ही संज्ञा मान्य नव्हती.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

3. 'इण्टरलॅङ्ग्वेज प्रॅगमॅटिक्स' (Interlanguage Pragmatics) म्हणजे काय ?

(A) विविध भाषकांचा अन्य भाषांशी सार्थक परिचय करून देणे

(B) भाषकांना भाषांचा इतिहास शिकविणे

(C) संशोधकांना भाषांच्या नियमांचे प्रशिक्षण देणे

(D) स्रोत भाषेद्वारे लक्ष्य भाषेत रूपान्तर करण्याचा प्रयास करणे

4. वि. वा. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट' संहितेचे स्वरूप कोणते ?

(A) भाषान्तर

(B) रूपान्तर

(C) अनुवाद

(D) प्रभवस्वरूपी नाट्यकृती

5. कोणताही कथाकवी मूळ कथेचे भाषान्तर करीत असता घटनाचक्रांत परिवर्तन करीत असतो; कारण यामागे प्राय: त्याची व्यासवृत्ती वा सन्तवृत्ती कारणीभूत असते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

6. मराठीतील तौलनिक साहित्याभ्यासाच्या परंपरेत 'प्रभव' ही संकल्पना कोणी प्रथम मांडली ?

(A) निशिकान्त मिरजकर

(B) आनन्द पाटील

(C) सुधीर रसाळ

(D) वसन्त बापट

7. ग्रंथकार आणि त्यांचे ग्रंथ यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | सपन मजुमदार | (1) | श्री एपिक हिरॉइन्स |
| (*b*) | एस.एस. प्रावर | (2) | एक्सेज इन् क्रिटिसिझम |
| (*c*) | मॅथ्यू आर्नोल्ड | (3) | कम्पेरेटिव्ह लिटररी स्टडिज |
| (*d*) | शिशिरकुमार दास | (4) | कम्पेरेटिव्ह लिटरेचर : इण्डियन डायमेन्शन्स |
| | | (5) | द चॅलेंज ऑव्ह कम्पेरेटिव्ह लिटरेचर |

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (3) | (4) |
| (B) | (2) | (3) | (4) | (1) |
| (C) | (4) | (3) | (2) | (1) |
| (D) | (3) | (4) | (1) | (2) |

8. स्रोत नाटकात उपयोजिलेल्या कोणत्या घटकामुळे भाषान्तरकारासमोर आव्हान उभे राहते ?

(A) सांस्कृतिक कलाप्रकार

(B) परपुष्टपणा

(C) कल्पनादारिद्र्य

(D) नाटककाराची शैली

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



9. भारतातील सांस्कृतिक प्रदेश व तेथील पारंपरिक लोकमंच यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | भवई | (1) | मणीपूर |
| (*b*) | जात्रा | (2) | गुजरात |
| (*c*) | नौटंकी | (3) | बंगाल |
| (*d*) | तियात्र | (4) | गोवा |
| | | (5) | उत्तरप्रदेश |

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (3) | (5) | (1) |
| (B) | (2) | (3) | (5) | (4) |
| (C) | (1) | (2) | (3) | (5) |
| (D) | (4) | (3) | (2) | (1) |

10. भाषान्तर करीत असताना भाषांतरकार वर्ण्यविषय अधिक परिणामकारक कसा करू शकतो ?

(A) भाषांतरणाच्या मर्यादा व अडचणी दूर करून

(B) पारिभाषिक शब्दांची सार्थक निवड करून

(C) मूल भाषेचे व लक्ष्य भाषेचे ज्ञान अर्जित करून

(D) सुनिदर्शने देऊन

11. तंबाखू व्यवसायातील स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण करणारी 'झोंबडे' ही कादंबरी कोणाची आहे ?

(A) महादेव मोरे

(B) रा. रं. बोराडे

(C) आनंद यादव

(D) चंद्रकुमार नलगे

12. 'चंद्रबनातल्या सावल्या' हे ललितगद्याचे पुस्तक कुणाचे आहे ?

(A) द. ता. भोसले

(B) चंद्रकुमार नलगे

(C) रणजीत देसाई

(D) मधु मंगेश कर्णिक

13. कोरडवाहू शेतीचे, जमीनदार-कुळे यांच्यातील परस्परसंबंधांचे चित्रण करणारी र. वा. दिघे यांची कादंबरी सांगा.

(A) कार्तिकी

(B) पडं रे पाण्या

(C) पाणकळा

(D) आई आहे शेतात

www.prepp.in



14. 'दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर' हा ग्रंथ कोणाचा आहे ?
   (A) भालचंद्र फडके
   (B) दत्ता भगत
   (C) बाबूराव बागूल
   (D) गंगाधर पानतावणे

15. बाबूराव बागूल प्रख्यात दलित कथाकार होते तसेच त्यांनी दलित साहित्य समीक्षेत मौलिक भर घातलेली आहे.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) संपूर्ण विधान चूक
   (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

16. कुडमुडे जोशी जमातीच्या जीवनाचे चित्रण असणारे आत्मकथन कोणते ?
   (A) शापित
   (B) मातीचं आकाश
   (C) गबाळ
   (D) तांडा

17. आलीय मरीबाई। तिनं गाड्याला केला साज॥
   हाती कोरडा। त्याला बाक॥१॥
   आलीय मरीबाई। तिचा कळेना अनुभऊ॥
   भल्या भल्यांचा घेती जिऊ॥
   हे गीत गाणाऱ्या लोककलावंतास कोणत्या संज्ञेने संबोधले जाते ?
   (A) आरादी
   (B) गोंधळी
   (C) पोतराज
   (D) बहुरूपी

18. 'जाखडीनृत्य' कोणत्या प्रदेशात प्रचलित आहे ?
   (A) कोकण
   (B) विदर्भ
   (C) मराठवाडा
   (D) खानदेश

19. बोधिसत्वाच्या पूर्वजन्माचे चित्रण पुढीलपैकी कोणत्या ग्रंथात आलेले आहे ?
   (A) बृहत्कथा
   (B) जातककठ्ठकथा
   (C) अरेबियन नाइटस्
   (D) बौद्ध रामायण

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



20. गोपालिन → गवळण → गौळण अशी गौळण संज्ञेची व्युत्पत्ती पुढीलपैकी कोणत्या शब्दकोशात सांगितलेली आहे ?

(A) ज्ञानकोश

(B) बहद् शब्दकोश

(C) महाराष्ट्र शब्दकोश

(D) समाजविज्ञान कोश

21. ''एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या टीकात्मक अभ्यास साम्ग्र्याने तयार असला तर त्या प्रकाराची अधिक तत्त्वनिष्ठ, तंत्रनिष्ठ किंवा समाज विश्लेषणात्मक चर्चा करणे शक्य होते, अन्यथा गुणावगुणांचे विवेचन व वाङ्मयेतिहासातील प्रवृत्तींचे दिग्दर्शन पुढे ढकलणे प्राप्त होते.'' वाङ्मयेतिहास लेखनातील या अडचणींचा उल्लेख कोणी केला आहे ?

(A) न. र. फाटक

(B) कुसुमावती देशपांडे

(C) ग. रं. दंडवते

(D) वि. सी. सरवटे

22. वाङ्मयेतिहासाविषयक ग्रंथांचा प्रकाशनकालानुसार क्रम सांगा.

**ग्रंथ** — वाङ्मयेतिहासाची संकल्पना, संतसाहित्य : अभ्यासाच्या दिशा, वाङ्मयेतिहास : सद्य:स्थिती आणि अपेक्षा, प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप.

(A) संतसाहित्य : अभ्यासाच्या दिशा, प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, वाङ्मयेतिहासाची संकल्पना, वाङ्मयेतिहास : सद्य:स्थिती आणि अपेक्षा

(B) प्राचीन मराठी साहित्याचे स्वरूप, वाङ्मयेतिहासाची संकल्पना, संतसाहित्य : अभ्यासाच्या दिशा, वाङ्मयेतिहास : सद्य:स्थिती आणि अपेक्षा

(C) संत साहित्य : अभ्यासाच्या दिशा, वाङ्मये-तिहास : सद्य:स्थिती आणि अपेक्षा, प्राचीन मराठी साहित्याचे स्वरूप, वाङ्मयेतिहासाची संकल्पना

(D) वाङ्मयेतिहास : सद्य:स्थिती आणि अपेक्षा, प्राचीन मराठी साहित्याचे स्वरूप, संतसाहित्य : अभ्यासाच्या दिशा, वाङ्मयेतिहासाची संकल्पना

www.prepp.in



23. ''विंध्याद्रिपासौनि दक्षिणदिशेसी। कृष्णनदीपासौनि उत्तरेसी। झाडीमंडळापासौनि पश्चिमेसी। महाराष्ट्र बोलिजे'' ही महाराष्ट्राची सीमारेषा कोणी सांगितली आहे ?
    (A) गुर्जर शिवबास
    (B) चोभाकवी
    (C) केशिराजबास
    (D) डिंभ कृष्णमुनी

24. 'कृष्णाबाई' या नावाने कथालेखन करणाऱ्या लेखिकेचे नाव काय आहे ?
    (A) कमळाबाई टिळक
    (B) मालतीबाई बेडेकर
    (C) मुक्ताबाई दीक्षित
    (D) गिरिजाबाई केळकर

25. अमृतराय उर्फ रायजी यांचे गुरू कोण होते ?
    (A) निरंजन माधव
    (B) आनंदतनय
    (C) शिवदिन केसरी
    (D) मध्वमुनीश्वर

26. 'सांध्यपर्वातील वैष्णवी' हा कवितासंग्रह कोणाचा आहे ?
    (A) आरती प्रभू
    (B) वैशाख
    (C) ग्रेस
    (D) मनमोहन

27. ''इथूनच शब्दांच्या हाती मी फुले ठेवीत आहे इथूनच शब्दांच्या हाती खड्ग मी देत आहे.'' हा निर्धार व्यक्त करणाऱ्या कवीचे नाव सांगा.
    (A) नारायण सुर्वे
    (B) शरच्चंद्र मुक्तिबोध
    (C) नामदेव ढसाळ
    (D) विंदा करंदीकर

28. 'गंगार्पण', 'मध्यंतर' हे कोणाचे कथासंग्रह आहेत ?
    (A) श्याम मनोहर
    (B) आशा बगे
    (C) राजेंद्र बनहट्टी
    (D) भारत सासणे

29. ''एका धाडसी फटकाऱ्यात नेमाडे यांनी मराठी गद्य आणि मराठी कथावाङ्मय यांचे स्वरूप पालटून टाकले. या कादंबरीला कथानक नाही, घाटही नाही.'' 'कोसला' बद्दल हे आकलन कोणाचे आहे ?
    (A) विलास सारंग
    (B) हरिश्चंद्र थोरात
    (C) अशोक शहाणे
    (D) किशोर सानप

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



30. 'ससेमिरा' ही कादंबरी कोणी लिहिली आहे ?

(A) केशव मेश्राम

(B) चिं. त्र्यं. खानोलकर

(C) व्यंकटेश माडगूळकर

(D) त्र्यं. वि. सरदेशमुख

31. दलित साहित्य चळवळीसाठी वाहिलेले 'अस्मितादर्श' हे नियतकालिक कधी सुरू झाले ?

(A) 1965

(B) 1967

(C) 1966

(D) 1968

32. "चळवळ म्हणजे काही

दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे;

की नदीला आलेला पूर नव्हे।

चळवळ म्हणजे माणूसकीचा गाभा

सतत विकसित होत जाणारा प्रवाह"

हो चळवळीशी नाते सांगणारी कविता कोणाची आहे ?

(A) भुजंग मेश्राम

(B) नीलकांत कुलसंगे

(C) वाहरू सोनावणे

(D) वामन शेळमाके

33. "पाश्चिमात्य जगात स्त्रीवादाचा उदय इ.स. 1960 नंतर झाला, तर भारतात स्त्रीवाद 1980 नंतरच रुजू झाला."

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

34. 'अहिंसा परमोधर्मः' हे घोषवाक्य पुढीलपैकी कोणत्या साहित्य प्रवाहाचे आहे ?

(A) ख्रिस्ती साहित्य

(B) जनसाहित्य

(C) जैन साहित्य

(D) मुस्लिम साहित्य

35. पुढीलपैकी कोणते नियतकालिक दलित साहित्याच्या चळवळीशी संबंधित नाही ?

(A) निकाय

(B) सुगावा

(C) मनोहर

(D) जातक

36. सहकार चळवळ ग्रामीणांच्या जीवनात कसे दु:ख निर्माण करते, याचा वेध पुढीलपैकी कोणत्या कादंबरीतून घेतलेला आहे ?

(A) इंधन

(B) हल्गार

(C) पाचोळा

(D) विषवृक्षाच्या मुळ्या

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



37. 'प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध निरनिराळ्या आघाड्या-वर लढणाऱ्या ग्रामीण पुरागामी मार्क्सवादी, दलित, आदिवासी, स्त्रीवादी या सर्वच वाङ्‌मयीन उन्मेषकांना जनसाहित्य आपले मित्र मानते.'' असे विधान कोणी केले आहे ?

(A) या. वा. वडस्कर

(B) सुरेंद्र बारलिंगे

(C) सदा कऱ्हाडे

(D) सुभाष सावरकर

38. स्त्रीवादी चळवळींचा आढावा घेणारे ग्रंथ आणि त्याच्या लेखिका यांच्या जोड्या जुळवा :

(*a*) स्त्रीमुक्ती चळवळ (*i*) चंपा लिमये

(*b*) स्त्री चळवळींची वाटचाल (*ii*) सरोजिनी शारंग-पाणी

(*c*) स्त्रीमुक्ती संग्राम (*iii*) शांता रानडे

(*d*) अबला होई प्रबला (*iv*) कुमुद करकरे

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (B) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |

39. महाराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांचे पहिले साहित्य संमेलन कोठे संपन्न झाले ?

(A) पुणे

(B) नाशिक

(C) मुंबई

(D) गोवा

40. भुजंग मेश्राम यांचा 'आदिवासी कविता' हा काव्यसंग्रह पुढील कोणत्या भाषेतून प्रसिद्ध झाला आहे ?

(A) मावची

(B) भिल्ली

(C) गोंडी

(D) हलबी

41. ''आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलानलंही नाही
बोटाच्या इशाऱ्यांनी
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली''
ह्या काव्यपंक्ती कोणत्या कवीच्या आहेत ?

(A) भुजंग मेश्राम

(B) चामुलाल राठवा

(C) विनोद कुमरे

(D) वाहरू सोनवणे

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



42. पाश्चिमात्य जगात स्त्रीवादाचा उदय इ.स. पुढीलपैकी कोणत्या वर्षी झाला ?

(A) 1950

(B) 1960

(C) 1940

(D) 1970

43. 'वैतागवाडी' ही कादंबरी महानगरातील घराच्या प्रश्नांवर भाष्य करणारी असून तिचे लेखक पु. भा. भावे आहेत.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

44. सतीश रणदिवे यांची 'वापसी' कादंबरी कॅथालिक समाजातील धर्मगुरू बनण्यास गेलेल्या तरुणाची कहाणी वाचकासमोर उभी करत असून, या कथानकात शरीरमनात उद्‌भवलेली उपभोगाची अभिलाषा आणि ती शमविण्यासाठी चालवलेले प्रयत्न यांतील संघर्ष चित्रित केला आहे.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

45. भाग्यशाली भावंडे, साहसी मुले, एवढीशी मुले हे वास्तव आणि साहसी कथासंग्रह कुणाचे आहेत ?

(A) न. म. जोशी

(B) राजीव तांबे

(C) दत्ता टोळ

(D) शांतीलाल भंडारी

46. विदर्भ साहित्य संघाच्या वतीने पहिले अखिल भारतीय मराठी विज्ञानसाहित्य संमेलन कोणत्या वर्षी भरविण्यात आले होते ?

(A) 1984

(B) 1985

(C) 1974

(D) 1940

47. एकाच माळेचे मणी, अंधेरनगरी, मोहविमोचन ही विनोदी नाटके कुणाची आहेत ?

(A) हेमचंद्र जैन

(B) कुमार मृत्युंजय माळगावे

(C) सुमेरचंद जैन

(D) बबन जमादार

www.prepp.in



48. 'रत्नाची पारख' या नाटकाचे लेखन पुढीलपैकी कोणी केले आहे ?
   (A) बबन जमादार
   (B) सुमेरचंद जैन
   (C) एस. एस. चौगुले
   (D) प्रभावती शहा

49. बालसाहित्याचा नंदादीप असा पुढीलपैकी कोणाचा उल्लेख केला जातो ?
   (A) विजया वाड
   (B) तारा वैशंपायन
   (C) लीलावती भागवत
   (D) सुमती पायगावकर

50. 'विज्ञान साहित्यविश्व' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?
   (A) निरंजन घाटे
   (B) बाळ फोंडके
   (C) म. सु. पगारे
   (D) जयंत नारळीकर

51. पुढीलपैकी वामनाचा ग्रंथ कोणता ?
   (A) काव्यालंकारसारसंग्रह
   (B) काव्यालंकार
   (C) काव्यालंकारसूत्रवृत्ती
   (D) काव्यादर्श

52. रसास्वादाकरिता विभावादिकांचे साधारणीकरण झाले पाहिजे असे सांगून रसास्वादाच्या प्रक्रियेत रसिकाचाही अंतर्भाव करणारा मीमांसक कोण ?
   (A) भट्टनायक
   (B) लोल्लट
   (C) श्रीशंकुक
   (D) अभिनवगुप्त

53. प्रतिभेचे 'सहजा' व 'उत्पाद्या' असे दोन प्रकार कोणत्या मीमांसकाने केले आहे ?
   (A) हेमचंद्र
   (B) रुद्रट
   (C) मम्मट
   (D) वामन

54. 'तिचे मुख म्हणजे चंद्रबिंबच' हे पुढीलपैकी कोणत्या लक्षणेचे उदाहरण आहे ?
   (A) गौणी साध्यवसाना
   (B) शुद्धा साध्यवसाना
   (C) गौणी सारोपा
   (D) लक्षणलक्षणा

55. वामनाच्या मते काव्यगुणांची संख्या किती ?
   (A) सहा
   (B) आठ
   (C) सात
   (D) दहा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



56. 'महानुभाव : साहित्यदर्शन' हा ग्रंथ कोणाचा ?

(A) शं. गो. तुळपुळे

(B) अुषा माधव देशमुख

(C) वि. भि. कोलते

(D) यू. म. पठाण

57. 'वाल्मिकीने शतकोटी रामायण रचले त्याच धर्तीवर शतकोटी अभंग रचण्याची कल्पना नामदेवांना सुचली असावी'—असे कोणी म्हटले आहे ?

(A) हे. वि. इनामदार

(B) रा. द. रानडे

(C) सोनोपंत दांडेकर

(D) गं. बा. सरदार

58. द. सी. पंगू यांनी सामराजाचे 'रुक्मिणीहरण' हे कल्पनाविलासात्मक महाकाव्य असल्याचे सांगितले असले, तरी सामराजास मात्र महाकवी म्हणून संबोधले नाही.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

59. 'धड संत नव्हे, धड शाहीरही नाही' असा अभिप्राय प्रा. रा. श्री. जोग यांनी कोणत्या शाहिरांच्या बाबतीत दिला आहे ?

(A) रामजोशी

(B) परशराम

(C) अनंतफंदी

(D) प्रभाकर

60. पुढील बखरींचा त्यांच्या लेखनकाळानुसार क्रम लावा.

(A) पानिपतची बखर, गायकवाड यांची हकिकत, पेशव्यांची बखर, छत्रपती संभाजी बखर

(B) गायकवाड यांची हकिकत, पानिपतची बखर, पेशव्यांची बखर, छत्रपती संभाजी बखर

(C) पेशव्यांची बखर, छत्रपती संभाजी बखर, गायकवाड यांची हकिकत, पानिपतची बखर

(D) छत्रपती संभाजी बखर, पेशव्यांची बखर, पानिपतची बखर, गायकवाड यांची हकिकत

61. 'असंज्ञा' या शब्दाचा अर्थ काय आहे ?

(A) नेणिव

(B) जागृतता

(C) जाणीव

(D) अचेतनता

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



62. स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून संदिग्धता कशा-विषयी आहे ?

(A) नाट्यछटा

(B) प्रहसन

(C) विनोद

(D) एकांकिका

63. 'द बर्थ ऑफ ट्रॅजेडी' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) बर्गसाँ

(B) नीत्शे

(C) शोपेनहॉएर

(D) बोझांकिट

64. मध्यान्ह किंवा उन्हाळा हा ऋतू कोणत्या साहित्य-प्रकाराच्या मुळाशी आहे ?

(A) शोकान्तिका

(B) सुखात्मिका

(C) नाट्यछटा

(D) सटायर

65. 'आस्वादक समीक्षे'च्या मर्यादा पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकाने दाखवल्या आहेत ?

(A) गंगाधर गाडगीळ

(B) रा. भा. पाटणकर

(C) विजया राजाध्यक्ष

(D) गो. म. कुलकर्णी

66. मराठीत ललित प्रवासलेखनाची परंपरा कोणत्या प्रवासवर्णनापासून सुरू झाली असे मानले जाते ?

(A) तोकोनोमा

(B) अपूर्वाई

(C) माझा प्रवास

(D) गोपुरांच्या प्रदेशात

67. अनिमा-अनिमस म्हणजे पुरुषमनातील स्त्रीप्रतिमा व स्त्रीमनातील पुरुषप्रतिमा या संकल्पना कोणी मांडल्या आहेत ?

(A) सर जेम्स जॉर्ज फ्रेझर

(B) कार्ल युंग

(C) सिग्मंड फ्रॉइड

(D) मॉड बॉडकिन

www.prepp.in



68. 'निबंध' या साहित्यप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण कोणते ?
   (A) तार्किक युक्तिवाद
   (B) लालित्यपूर्ण शैली
   (C) काव्यात्मकता
   (D) स्वैर रचना

69. संकेतांचे उल्लंघन हे कोणत्या प्रकारच्या नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण आहे ?
   (A) संगीत नाटक
   (B) एकांकिका
   (C) क्षोभनाट्य
   (D) प्रायोगिक नाटक

70. 'अतिनाट्या'चे प्रधान लक्षण कोणते आहे ?
   (A) क्षोभ
   (B) भय
   (C) कारुण्य
   (D) प्रमाणबद्धता

71. कृषिजीवनातील प्राण्यांशी होणाऱ्या वर्तनाचा एक वेगळा पैलू शंकर पाटील यांच्या पुढीलपैकी कोणत्या कथेतून व्यक्त झाला आहे ?
   (A) नाटक
   (B) वळीव
   (C) सूड
   (D) शारी

72. 'लीळाचरित्रा'त तैल्यकाराची आणि स्वामींची भेट कोठे झाली ?
   (A) रामटेक
   (B) काटोल
   (C) सेंदुरजन
   (D) आंध्रदेशी

73. 'पान्हा' ही कविता पुढीलपैकी कोणत्या संग्रहातील आहे ?
   (A) तुही यत्ता कंची
   (B) भिजकी वही
   (C) जनाबाईचे अभंग
   (D) पायी चालणार

74. 'हरी तुझी कांति रे सावळी। मी रे गोरी चांपेकळी।' ही गौळण रचना कोणाची आहे ?
   (A) संत ज्ञानदेव
   (B) संत तुकाराम
   (C) संत नामदेव
   (D) संत एकनाथ

75. 'आनंदओवरी' मध्ये आईने अलंकारांची जास्त हौस कोणावर भागवली ?

(A) कान्होबा

(B) सावजी

(C) तुकाची बायको

(D) तुका

76. सभासदाच्या बखरीमध्ये एकूण किती प्रकरणांचा समावेश आहे ?

(A) 123

(B) 132

(C) 135

(D) 137

77. जगण्याविषयीच्या प्रगल्भ भानापासून कथेच्या नेमक्या शिल्पापर्यंत बय आणि डिग्या यांच्या चित्रणापासून कथेशी असलेल्या निवेदकाच्या संबंधापर्यंत साऱ्या गोष्टी जयंत पवार यांनी कोणत्या कथेतून जाणीपूर्वक सूक्ष्मतेने हाताळलेल्या आहेत असे म्हणता येईल ?

(A) सर निघाले सप्तपाताळाकडे

(B) तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य

(C) अगोचरही वास्तवच असतं

(D) वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा

78. 'घाल जागरण/तुझ्या/लोखंड पचविणाऱ्या आतड्यांचे' ह्या ओळी नामदेव ढसाळ यांच्या 'तुही यत्ता कंची' या संग्रहातील कोणत्या कवितेच्या शेवटी आहेत ?

(A) छबुकलं दारिद्र्य

(B) वारलेल्या माणसाची गोष्ट

(C) निळू फुले : एक निमित्त वरपांगी

(D) आंबेडकर

79. 'कोण म्हणतं टक्का दिला' या नाटकाचे विष्णू वाघ यांनी लिहिलेले कोंकणी अनुसर्जन पुढीलपैकी कोणते ?

(A) बेकार जांवय लाखां धनी

(B) हल्ह्या हिर्रर्ऽऽ

(C) कासाळे आणि घोसाळे

(D) हांगा नाय जातीचे

80. 'आज्ञापत्रातं आलेल्या जरबाब' या शब्दाचा अर्थ कोणता ?

(A) भरजरी वस्त्र

(B) लोकरी वस्त्र

(C) रेशमी वस्त्र

(D) सुसंपन्न

81. भाषिक चिन्हाचा पुढीलपैकी कोणता विशेष नाही ?

(A) उच्चार आणि प्रतीत होणारा अर्थ यांचा संयोग

(B) दोन अंगांची अतूटता

(C) सौंदर्यपूर्णता

(D) भाषाविशिष्टता

82. शब्दांना ध्वनी वा संगीताची दृश्यासह जोड देऊन मुख्यत्वे काय साध्य होते ?

(A) मनोरंजन व लोकानुरंजन

(B) नव्या दृक्‌श्राव्य प्रतिमांची निर्मिती व त्यातून नवे अर्थसूचन

(C) नावीन्यपूर्णता

(D) संवेदनानुभवाची समृद्धी

83. सर्वसाधारण भाषाविष्कारास व्याकरणिक नियमांचे बंधन असते, मात्र साहित्यातील भाषाविष्कारावरही वेगळ्या प्रकारची अधिक बंधने असतातच.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

84. मराठी व्याकरणकारांनी शब्दांच्या आठ जाती मानल्या, कारण :

(A) संस्कृत व्याकरणात आठ वर्ग मानले होते

(B) इंग्रजी व्याकरणाचा नमुना समोर होता

(C) आठ विभक्तींशी संबंध जोडला गेला

(D) आठ ही संख्या महत्त्वाची वाटली

85. विभक्ती प्रत्ययांचा समावेश पुढीलपैकी कोणत्या गटात करावा, अशी सूचना अभ्यासक करतात ?

(A) शब्दयोगी

(B) आख्यात

(C) केवलप्रयोगी

(D) उभयान्वयी

86. पुढीलपैकी कोणते अक्षरगणवृत्त नाही ?

(A) मंदारमाला

(B) उपेंद्रवज्रा

(C) पादाकुलक

(D) भुजंगप्रयात

87. पुढीलपैकी कोणत्या भाषा एका भाषाकुळातील आहेत ?

(A) मराठी, गुजराती, सिंधी

(B) मराठी, कन्नड, तेलगू

(C) उडिया, कन्नड, तमीळ

(D) गुजराती, कोकणी, कन्नड

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



88. कार्यकर रूपिमांचा गट पुढीलपैकी कोणता ?

(A) माणूस, गाय, की

(B) भाषा, विचार, कृती

(C) दया, सुंदर, पणा

(D) त, ला, ई

89. भाषेवर परिणाम करणाऱ्या सामाजिक घटकांमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होत नाही ?

(A) व्यक्तीची सामाजिक पार्श्वभूमी

(B) समाजातील प्रतिष्ठेच्या कल्पना

(C) व्यक्तीचे आनुवंशिक गुणधर्म

(D) व्यक्तीची व्यावसायिक पार्श्वभूमी

90. बोलींचे नमुने गोळा करताना पुढीलपैकी कोणती गोष्ट उपकारक ठरत नाही ?

(A) निवेदकाचे प्रौढत्व

(B) निवेदकांची मोजकी संख्या

(C) प्रशिक्षित क्षेत्रीय संशोधक

(D) प्रश्नावली व मूलभूत शब्दसंग्रहाचा विचार

91. 'दलित नाटक भडक आहे हे मत मला मान्य नाही. ज्या अर्थी दलित नाटक भडक आहे.... त्याच अर्थाने मराठीतील अर्ध्याहून अधिक नाटके भडक आहेत', हे विधान कोणाचे आहे ?

(A) दत्ता भगत

(B) रा. ग. जाधव

(C) प्रेमानंद गज्वी

(D) भि. शि. शिंदे

92. 'सांस्कृतिक अस्मिता आणि जागतिकीकरण' ही पुस्तिका कोणी लिहिली आहे ?

(A) भालचंद्र नेमाडे

(B) रंगनाथ पठारे

(C) मकरंद साठे

(D) गो. पु. देशपांडे

93. इंग्रजांनी नुसती नवी अर्थव्यवस्था आणली असे नाही, त्यांनी व्यक्तिवादाला अनन्य महत्त्व देणारा एक संपूर्ण सांस्कृतिक संकल्पनाव्यूह आणला, अशी वैचारिक मांडणी कोणी केली आहे ?

(A) रा. भा. पाटणकर

(B) स. गं. मालशे

(C) य. दि. फडके

(D) मिलिंद मालशे

94. 'एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या चरणात नवशिक्षित वर्गाने आपल्या पारंपरिक वाङ्मयीन संस्कृतीला आधुनिक रूप देण्याऐवजी तिच्याशी काडीमोड घेतला. या घटनेमुळे आपली वाङ्मयीन संस्कृती खंडित झाली', हे विधान कोणाचे आहे ?

(A) रा. भा. पाटणकर

(B) सुधीर रसाळ

(C) वसंत आबाजी डहाके

(D) भालचंद्र नेमाडे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



95. लोकनाट्य, लोकसंगीत, मुक्तनाट्य, नवकाव्य या दलितांच्या कला आहेत. आज त्या लोककला मध्यमवर्गीय साहित्याने आत्मसात केल्या आहेत, अशी भूमिका कोणत्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणात आली आहे ?
   (A) नारायण सुर्वे
   (B) य. दि. फडके
   (C) शंकरराव खरात
   (D) रा. ग. जाधव

96. छापील शब्द हा ज्ञानप्रसाराचे, सांस्कृतिक प्रभावाचे आणि विचारजागृतीचे साधन आहे, हे एकोणिसाव्या शतकातच लक्षात आले होते. त्यामुळे निबंधाप्रमाणे कादंबरी हा साहित्यप्रकारही विचारांना चालना देऊ शकतो, असे लेखकांनी गृहीत धरल्याचे दिसते, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण कोणी नोंदवले आहे ?
   (A) वसंत आबाजी डहाके
   (B) हरिश्चंद्र थोरात
   (C) भालचंद्र नेमाडे
   (D) कुसुमावती देशपांडे

97. गांधीवाद बुद्धिवादी नाही, म्हणून बुद्धिजीवी वर्ग त्याला विरोध करत आहे, हे खरे नसून, तो क्रांतिकारक आहे, म्हणून बुद्धिजीवी वर्ग त्याच्यापासून अलिप्त रहात आहे, असे म्हणणे अधिक संयुक्तिक होईल, असे कोणी म्हटले आहे ?
   (A) वसंत पळशीकर
   (B) द. दि. पुंडे
   (C) शंकरराव देव
   (D) शं. द. जावडेकर

98. र. धों. कर्वे यांचा 'अमर्याद संतती' हा लेख कोणत्या मासिकात प्रकाशित झाला होता ?
   (A) समाजस्वास्थ्य
   (B) किर्लोस्कर खबर
   (C) किर्लोस्कर
   (D) बहिष्कृत भारत

99. व्यक्तिस्वातंत्र्याची मांडणी करणारी 'बंधनाच्या पलीकडे' ही कादंबरी कोणी लिहिली आहे ?
   (A) पुरुषोत्तम यशवंत देशपांडे
   (B) श्रीधर व्यंकटेश केतकर
   (C) रघुनाथ धोंडो कर्वे
   (D) ग. त्र्यं. माडखोलकर

100. विभावरी शिरूरकर सदाशिवपेठी संस्कृतीत वाढल्या आणि त्या संस्कृतीच्या मर्यादा त्यांच्या जीवनचित्रणाला पडल्या, अशी मीमांसा कोणी केली आहे ?
   (A) शं. दा. पेंडसे
   (B) नरहर कुरुंदकर
   (C) त्र्यं. शं. शेजवलकर
   (D) लालजी पेंडसे

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide